अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# रेल्वेचे शयनयान की शवयान

सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारतात रेल्वे आणि रस्त्यांवरच सर्वाधिक अपघात होतात ही सर्वात मोठी शोकांतिका ठरते. सर्वाधिक लोकसंख्या असणे हा भारताचा दोष नाही. या मनुष्यशक्तीचा योग्य उपयोग आणि त्याचे मूल्य लक्षात घेतले जात नाही. त्यातूनच अशा प्रकारचे अपघात घडतात. गेल्याच आठवड्यात माळशेज घाटात बस कोसळून ३८ प्रवासी मृत्यूमुखी पडले. तर डहाणूजवळ डेहराडून एक्सप्रेसला आग लागल्यामुळे जवळपास दहा प्रवाशांना आपली जीवनयात्रा संपवावी लागली. याशिवाय रोज देशभरात किंवा राज्यात वेगवेगळ्या रस्ते अपघातांमध्ये सरासरी दहा लोक ठार होतात, अशा प्रकारची आकडेवारी पुढे आली आहे. केवळ नादुरुस्त रस्ते आणि सुरक्षिततेच्या बाबतीतला अक्षम्य निष्काळजीपणा या कारणांमुळे जर ही मनुष्यहानी होत असेल तर आपल्या देशामध्ये आपणच मानवतेच्या उच्च तत्त्वांना कलंकित करतो आहोत असे म्हणणे भाग पडते. अगदी दोनच दिवसापूर्वी पश्चिम रेल्वेच्या रुळांना तडा गेल्याचे आढळून आले. तर मध्य रेल्वेच्या रेल्वे यार्डातच एका लोकलच्या पेंटाग्राफला आग लागून वाहतूक विस्कळीत होण्याचा प्रकार घडला. म्हणजे या अपघातांच्या सरासरीच्या प्रमाणातच रेल्वे किंवा रस्त्यांच्या असुरक्षिततेचे प्रमाण सारखे पडते असे म्हणावे लागेल. देशातल्या सर्वात मोठे जाळे असलेल्या रेल्वेचा उपयोग तितक्याच मोठ्या प्रमाणावर होतो. ज्या रेल्वेचा हा व्याप नीट सांभाळता यावा म्हणून स्वतंत्र रेल्वे अर्थसंकल्प सादर केला जातो. परंतु, असे असूनही सुरक्षिततेच्या बाबतीत रेल्वे किंवा राज्य सरकार कमालीची उदासिनता दाखवित आले आहे. डहाणूजवळ या एक्सप्रेसला लागलेल्या आगीत तीन डबे जळून खाक झाले. प्रवाशांच्या थोड्याशा सावधानतेमुळे प्राणहानी वाचवता आली. परंतु या सगळ्या प्रकारातून रेल्वेचा निष्काळजीपणाच चव्हाट्यावर येतो. आता तांत्रिक कारणांमुळे बिघाडांमुळे काही ना काही घटना घडत राहतात असे कारण सहजपणे पुढे सांगता येते. परंतु ती एका अर्थी पळवाट म्हणावी लागेल. पाच दहा वर्षांमध्ये एखादा अपघात घडला तर ते समजू शकते. परंतु वर्षामध्ये देशभरात कुठे ना कुठे पाच सहा मोठे रेल्वे अपघात होत असतात आणि त्यात प्रवाशांचे बळी जातात. तोच प्रकार रस्ते अपघातांचाही आहे. स्वातंत्र्य मिळून पासष्ट वर्ष झाली. आता ज्या काही मुलभूत सोयीसुविधा आहेत त्या अधिक कार्यक्षम होण्याची गरज आहे. रेल्वेचा व्याप तर शंभर दीडशे वर्षांपासून भारतात अस्तित्वात आहे. काळाबरोबर ज्या पध्दतीने आणि ज्या वेगाने रेल्वेच्या कारभारात आधुनिकता आणि सुरक्षितता यायला हवी ती येऊ शकलेली नाही. ती यावी म्हणून सरकारलाही त्याची निकड वाटत नाही. तसे प्रयत्न युध्दपातळीवर होत नाहीत आणि त्याचाच परिणाम म्हणून अशा अपघातांना आपोआपच आमंत्रण मिळत राहते.

## घातपाताची शक्यता तपासावी

गेल्या वर्षीच्या रेल्वे अंदाज पत्रकामध्ये रेल्वेच्या बोगींमध्ये विशेषत: एसी ट्रेन्समध्ये आगप्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठी विशेष आर्थिक तरतूद केली गेली होती. काही जणांचे असे म्हणणे आहे की, जी काही यंत्रणा बसवली गेली ती काही तितकीशी दर्जेदार नाही. त्यात वापरली गेलेली साधनसामुग्री अयोग्य असल्याचे आढळून आले आहे. म्हणजे, मग हा प्रवाशांच्या जीवाशीच खेळ खेळण्यासारखा प्रकार ठरतो. खरे तर केवळ दोन आठवड्याच्या काळात रेल्वेच्या आगीच्या दोन मोठ्या घटना घडाव्यात ही गोष्ट संशय निर्माण करणारी ठरते. विशेषत: रात्रीच्या वेळीच या घटना घडल्या आहेत. शयनयान असलेल्या या रेल्वे डब्यांच्या आगीत प्रवाशांची होरपळ झाली. अशा या घटनांमुळे रेल्वेच्या डब्यांना शयनयान म्हणावे की, शवयान म्हणावे? असा प्रश्न निर्माण होतो. २८ डिसेंबरला बंगळुरू-नांदेड एक्सप्रेसला अशीच आग लागली. २८ प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले होते. म्हणजेच दोन आठवड्यात तब्बल छत्तीस प्रवाशांना रेल्वेच्या आगीला बळी पडावे लागले असा त्याचा अर्थ निघतो. खरे तर या दोन्ही घटनांची रेल्वेने गंभीरपणे चौकशी करायला हवी. त्यात नेमक्या कोणत्या त्रुटी राहिल्या आहेत आणि या आगींची नेमकी कारणे काय आहेत याचा शोध घेतला पाहिजे. वारंवार होणारे हे प्रकार रेल्वेचा निष्काळजीपणा सिध्द करणारे आहेत यात काही शंका नाही. परंतु यात दोषी असणाऱ्यांविरुध्द रेल्वे काय कारवाई करणार किंवा आतापर्यंत काय कारवाई केली गेली, याचीसुध्दा माहिती बाहेर येणे गरजेचे आहे. भारतातील रेल्वेचे जाळे आणि त्यातून त्याचा लाभ घेणारी प्रवाशांची संख्या याचा विचार केला, तर रेल्वेकडून प्रवाशांच्या सुरक्षिततेविषयी प्राधान्याने विचार होताना दिसत नाही. प्रवासी हेच जर रेल्वेचे भांडवल असेल किंवा, त्यांचा सुरक्षित प्रवास हेच जर रेल्वेचे ध्येय असेल तर अशा प्रकारचे अपघात खरे तर होताच कामा नयेत. एखाद्या वेळेला तांत्रिक गोष्टींमुळे किरकोळ अपघात होणे समजू शकते. परंतु आगीसारखे प्रकार घडून त्यात प्रवासी होरपळून मृत्यूमुखी पडणे ही गोष्ट अत्यंत संतापजनकच ठरते.

## सरकारला अजूनही जाग नाही

जर दोन आठवड्यात दोन एक्सप्रेस गाड्यांमध्ये दोन मोठे आगींचे प्रकार घडत असतील तर तो घातपात नाही ना? याचाही विचार होणे आवश्यक ठरते. कारण सध्याची देशाची एकूणच परिस्थिती इतकी असुरक्षित आहे की कोणत्याही ठिकाणी कोणताही प्रकार घडू शकतो. आणि रेल्वेसारख्या गर्दीच्या ठिकाणी अशा प्रकारचा घातपात घडवून दहशतवादी आणि समाजकंटक अशा प्रकारचे कारस्थान यशस्वी करू शकतात. खरे सांगायचे तर आज रेल्वे किंवा रस्ते अपघातांबाबत केंद्र किंवा राज्य सरकारांकडे कोणतीही ठोस कृतीयोजना नाही. अपघात घडल्यानंतर अगदी राजधानी एक्सप्रेसपासून ते सामान्य पॅसेंजर गाड्यांमध्ये तातडीने वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्याची कोणतीच सोय नाही. अपघात झाल्यानंतर तातडीने कोणतेही मदत पथक पोहचू शकत नाही. कारण तसे ते जवळच्या रेल्वे स्थानकांवर अस्तित्वातच नाही. आतापर्यंत रेल्वे डब्यांना आगी लागण्याचे अनेक प्रकार घडले आहेत. पण ती विझवण्याची रेल्वे डब्यामध्ये कोणतीच यंत्रणा नाही. अशाच प्रकारचा निष्काळजीपणा रस्ते अपघातांबाबत होतो. परदेशांमध्ये अपघात घडल्यांनंतर केवळ नऊ मिनिटांत सर्वप्रकारची मदत पथके तैनात होतात. हेलिकॉप्टरच्या माध्यमातून वैद्यकीय सेवा आणि जखमींना उपचारासाठी योग्य त्या ठिकाणी नेण्याची व्यवस्था केली जाते. कारण तिथे मनुष्यहानी होऊ नये याची काळजी घेतली जाते. भारतातल्या राज्यकर्त्यांना किंवा सरकारी खात्यांना अजूनही जाग आलेली नाही हे या ताज्या घटनेने दाखवून दिले.